# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.
## विद्युत विभाग
## Walk in Interview Notice

इचलकरंजी महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील खालील विवक्षित कामकाजासाठी म.न.पा./ राज्य परिवहन तसेच अन्य शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सेवेतून त्या त्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अर्हताधारक अधिकारी / कर्मचारी यांचेकडून करार पद्धतीने सेवा उपलब्धतेकामी इम्पॅनेलमेंटकरिता खाली नमूद अटी/शर्तीस अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

**केंद्र शासन पुरस्कृत PM eBus योजना अंमलबजावणी कामी –**

**(१) डेपो मॅनेजर (आगार व्यवस्थापक) : ०१**
**(२) टेक्निकल इन्स्पेक्टर : ०१**

**अटी / शर्ती**

१) Walk in Interview करिता उपस्थित रहाणा-या तसेच मुलाखत प्रक्रीयेअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारावर महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक १० जून, २०२५ (महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध ) मधील सर्व अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

२) Walk in Interview करिता उपस्थित रहाणारा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरिक/मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) Walk in Interview करिता उपस्थित राहण्यासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे इतकी आहे.त्यापेक्षा अधिक वय असणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

४) इम्पॅनेलमेंट केल्यानंतर संबंधित विभागाकडे आवश्यकतेनुसार अधिका-यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार असून त्यापेक्षा अधिक उमेदवार पात्र ठरल्यास गुणानुक्रमे निवड करून उर्वरित उमेदवारांचा प्रतीक्षा सूचीमध्ये समावेश केला जाईल.

५) उमेदवाराच्या नियुक्तीसंबंधी तसेच करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही वेळी रद्द करण्याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा निर्णय अंतिम राहील.

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता/अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक ०४.०८.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

जा.क्र.विद्युत विभाग/ ९४ /२०२६.
दिनांक २८.०७.२०२६

अति.आयुक्त,
इचलकरंजी महानगरपलिका.

.....................................................................

ज. क्र.आस्था.व सा.प्र.वि./ ९४ /२०२६
महानगरपालिका कार्यालय,इचलकरंजी.
दिनांक २८.०७.२०२६

प्रति,
१)प्र.सिस्टीम मॅनेजर,
/- यांना उपरोक्त सूचना महानगरपालिकेच्या www.ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी व तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेसाठी . .

२) नाईक हवालदार,
/- यांना उपरोक्त सूचना महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे नोटीस बोर्डवर तसेच शहरातील मुख्य शासकीय कार्यालयांचे ठिकाणी प्रसिद्ध करून तसा अहवाल सादर करणेसाठी . .

प्र.उपअभियंता,
विद्युत विभाग,
इचलकरंजी महानगरपालिका.

Scanned with OKEN Scanner